सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,
जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

Website- www.sic.maharashtra.gov.in

दूरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र : १८८/२०२५/नाशिक

| तक्रारदार | प्रतिवादी<br>जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|
| श्री. रामदास कारभारी बच्छाव, रा.मु. पो. दरेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक-४२२४०५ | सहायक महसूल अधिकारी (जमाबंदी), तहसील कार्यालय, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक-४२३२०३ | निवासी नायब तहसिलदार, तहसील कार्यालय, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक |

## सुनावणी दिनांक १८/०३/२०२६

तक्रारदार यांनी दिनांक ०२/०५/२०२५ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १८/०३/२०२६ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीसाठी सर्व पक्षकार उपस्थित होते.

२) तक्रारदार यांनी आयोगाकडे सादर केलेल्या दिनांक ०२/०५/२०२५ रोजीच्या तक्रार अर्जात असे नमूद केले आहे की, "दिनांक १८/०२/२०२५ च्या माहिती अर्जाच्या व दिनांक २८/०३/२०२५ प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही. सबब त्यांच्यावर कलम २० (१) नुसार प्रत्येक दिवसाला रूपये २५० प्रमाणे जी रक्कम रू.२५०००/- पेक्षा जास्त नको एवढी शास्ती लावण्यासह कलम २० (२) नुसार शिस्तभंगाची कार्यवाईची शिफारस करण्यात यावी. तसेच माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (८) (ख) नुसार नुसार मला झालेल्या शारीरिक, मानसिक त्रासापोटी रूपये २० लाख नुकसान भरपाई देण्यात यावी. ज्या अर्थी जन माहिती अधिकारी यांनी कार्यालयीन गैरप्रकार लपवण्याचा दृष्टहेतूने व कोणतीही वाजवी कारण नसतांना देखील अर्जदाराच्या मूलभूत अधिकारावर गदा आणण्याचा प्रयत्न केला असून माहिती मिळविण्यापासून अर्जदारास वंचित ठेवण्यात आले. त्यामुळे कलम ७ च्या पोटकलम (१) अन्वये माहिती अधिकारी कायद्याचा भंग केल्याचे स्पष्ट होत असल्याने शास्तीची कारवाई करावी.

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक १८/०२/२०२५ च्या मूळ माहिती अर्जान्वये, जन माहिती अधिकारी यांचेकडे तहसील कार्यालय मालेगाव यांचे कडील पत्र क्र. जमा-३/कावी/१४४/२०२३ दि. ०७/०७/२०२३ जमा-३/कावी/४६५/२०२३, दि.१८/०७/२०२३ यासंदर्भात १ जानेवारी २०२३ ते दिनांक १८/०२/२०२५ पर्यंत *याकालावधीतील* खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

***"वरील दोन्ही पत्रांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम १७६ मधील तरतुदीनुसार रक्कम वुसली केली असल्यास त्या रक्कम भरणा बाबतचे online व offline भरणा केलेल्या चलनाच्या प्रमाणित प्रती तसेच आजपावेतो दंडाची रक्कम भरणा न केली असल्यास झालेल्या कारवाई बाबतची संपुर्ण कागदोपत्री मिळावीत. माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ (३) २ नुसार माहिती उपलब्ध होणेस विनंती."***

संबंधित जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याचे कारण नमूद करून तक्रारदार यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार, तहसिल कार्यालय, मालेगाव यांचेकडे दि. २८/०३/२०२५ रोजी प्रथम अपिल अर्ज दाखल केलेला आहे.

४)	सुनावणीवेळी उपस्थित प्रथम अपिलिय अधिकारी यांनी प्रस्तूत प्रकरणी दिनांक १७/०३/२०२६ अन्वये अहवाल सादर केला असून त्यात असे नमूद केले आहे की, सदर प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी (१) श्री. भाऊसाहेब दगा शेवाळे, अव्वल कारकुन, आस्थापना शाखा, तहसिल कार्यालयास मालेगांव तसेच (२) संदिप धारणकर, निवासी नायब तहसिलदार, तहसिल कार्यालय मालेगांव यांचेविरूध्द छावणी पोलीस स्टेशन मालेगांव येथे गुं.र.न. १३८/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१८ (४), ३१९, ३३६ (३), ३४० (२), ३३८, ३ (५), ६१ (२) सह भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ चे कलम ८ व ११ प्रमाणे गुन्हा दाखल असुन ते आजरोजी मध्यवर्ती नाशिक कारगृह नाशिक रोड नाशिक येथे न्यायालयीन कोठडीत आहेत.

तसेच संबंधित तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून अर्जदारास केंद्रीय माहितीचे अधिकारात दि. ०१ जानेवारी २०२३ ते आजपावेतो गौणखनिज संदर्भात झालेली शासकीय वसुलीच्या रक्कमा भरणाबतमाहितीची मागणी केलेली आहे. सदरची माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून अर्जदारास माहिती दिली नसल्याचे अभिलेखावरून दिसुन येत आहे. तत्राप आजरोजी कार्यरत असलेले जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडून अर्जदारास त्यांनी केद्रीय माहितीचे अधिकारात मागणी केलेली माहिती २ दिवसाचे आत विनामुल्य उपलब्ध करून देणेची तजविज ठेवुन आहोत.

५)	सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तुत नस्तीवरील कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांच्या दिनांक १८/०२/२०२५ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी (जमाबंदी), तहसील कार्यालय, मालेगाव, ता. मालेगाव, जि. नाशिक यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच, तक्रारदार यांना अद्यापपर्यंत माहिती पुरविली नसल्याचे दिसून येते. तक्रारदार यांनी तक्रार अर्जासोबत सादर केलेल्या प्रथम अपील अर्जावर केवळ माहिती अर्जाचा दिनांक नमूद केलेला असून माहितीचा विषय नमूद केला नसल्याकारणाने, सदर प्रथम अपील अर्ज कोणत्या माहिती अर्जासंदर्भातील याचा नेमका बोध होत नाही.

तसेच, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या खालील नमूद आदेशाप्रमाणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १८ (१) अंतर्गत तक्रारीमध्ये थेट माहिती देण्याचे आदेश पारीत करता येत नाही.

In the case of Chief Information Commissioner-Vs-State of Manipur (AIR 2012 SC 864), the Hon'ble Supreme Court has observed that a complaint under Section 18 of the Right to Information Act, 2005, could not be treated as appeal under Section 19 and, therefore Information Commissioner while entertaining a complaint under Section 18 of the Act has no jurisdication to pass an order providing for access to information.

मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार तक्रारीत माहिती देण्याचे आदेश पारीत होत नाही. सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१)	तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहायक महसूल अधिकारी (जमाबंदी), तहसील कार्यालय, मालेगाव यांनी तक्रारदार यांच्या दिनांक १८/०२/२०२५ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरून कोणतीही कार्यवाही केली नसून तक्रारदार यांना अद्यापर्यंत पुरविलेली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२)	वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र. **१८८/२०२५/नाशिक** निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ३३८२		दि. ८/०४/२०२६